# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 05/06/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

### जबरी संभोग

पो.स्टे. काटोलः– मार्च 2020 ते दि. 04/06/2020 पावेतो फिर्यादी यांची 14 वर्षीय पिडीत मुलगी हिला आरोपी नामे क्र. 1) राजेन्द्र पुंडलीक काळबांडे, वय 44 वर्ष, रा. पिपळगाव वखाजी, ता. नरखेड ह. मु. काटोल याने पिडीतेचा अज्ञानपणाचा व दिव्यांगपणाचा फायदा घेत तिच्यावर वांरवार लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केले. आरोपीने पिडीतेस मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपी क्र. 2) सिंधू वामनराव डेहनकर, वय 42 वर्ष, रा. काटोल व 3) सौ. फुलवंती सुकरचंद सिल्लू, वय 42 वर्ष, रा. अर्जून नगर, काटोल यांनी मिळुन पिडीतेचा गर्भपात करून पुरवा नष्ट करण्याचे अदेशाने गर्भास जमिनीमध्ये गाडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 376(2)(डी), 376(2)(एफ), 376(2)(जे), 376(2)(एल), 376(2)(एन), 376(3), 313,201, 109, 506 भादंवी सहकलम 4,6,17,21 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा सहकलम 3(1)(डब्ल्यू), 3(2)(व्ही ए) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी काटोल विभाग श्री नागेश जाधव हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौदा नान्हा मांगली येथे दिनांक 23/05/2020 चे 19.30 वा. दरम्यान सौ. सरोज मुरली भट, वय 45 वर्ष, रा. नान्हामांगली मौदा यांचे पती दारू पीत असल्याने नेहमी भांडन होत होते. या कारनावरून सरोज भट यांनी स्वतःच्या आंगावर प्लास्टीक डबकी मधिल डिझेल स्वताच्या अंगावर आतले व स्वतःला जाळुन घेतले. तिला उपचाराकरीता मेडीकल कॉलेज मध्ये भरती केले असता उपचार दरम्यान दि. 24.05.2020 चे 04.00 वा. तिचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे मपोनि नलीनी निंबेकर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर